# मुंबई विद्यापीठ

महाविद्यालयीन शिक्षक
मान्यता विभाग,
Concol/ICC/2020-21/7
१४ डिसेंबर, २०२०

विषय : – विद्यापीठ/महाविद्यालयीन स्तरावरील शिक्षिकांना "श्रीमती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार" (२०१९–२०).

परिपत्रकः

सर्व संलग्नीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधि, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी व वास्तुशास्त्र महाविद्यालये/संस्थांचे प्राचार्य/संचालक यांच्याकडून "श्रीमती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार" (२०१९–२०) प्रदान करण्याकरिता प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, श्रीमती सावित्रीबाई फुले यांनी त्यांच्या कालखंडात समाजामध्ये स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवून केलेल्या संस्मरणीय कार्याबद्दल व त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मुंबई विद्यापीठातर्फे सन २००३ या सालापासून विद्यापीठाच्या कार्यकक्षेत येणा–या महाविद्यालयांतील शिक्षिका (एक शहरी व एक ग्रामीण) अशा एकूण दोन आदर्श शिक्षिकांना "श्रीमती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार" प्रदान करून गौरव करण्यात येतो. सन २०१९–२० या सालाकरिता सदर पुरस्कारासाठी पात्र शिक्षिकांची निवड करण्यासाठी विद्यापीठ स्तरावर एक निवड समिती गठीत करण्यात येणार आहे. विद्यापीठातर्फे निवड होणा–या पुरस्कारप्राप्त शिक्षिकांना प्रत्येकी रूपये १०,०००/– रोख व त्यासोबत मानपत्र व स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात येईल.

विद्यापीठाचे विविध विभाग/महाविद्यालयीन स्तरावर किमान १५ वर्षे सलग स्थायी सेवा झालेल्या व विशेष गुणवत्ता, अर्हता प्राप्त केलेल्या आणि अनुभव असलेल्या पात्र शिक्षिकांचे आपणांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव विद्यापीठाने गठीत केलेल्या निवड समितीपुढे विचारार्थ ठेवण्यात येतील. स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी कार्यरत असलेल्या सेवाभावी संस्थामध्ये क्रियाशिल सहभाग व उल्लेखनीय कामगिरी, व्यक्तिगत स्तरावर केलेल्या कार्याबाबतचे विश्वासार्ह अहवाल, स्त्रियांच्या प्रश्नावर केलेले अभ्यासपूर्ण संशोधन व उल्लेखनीय लेखन, आर्थिक स्तरावर स्त्रियांना सक्षम करण्यासाठी केलेले प्रयत्न, स्वयंरोजगार, प्रशिक्षण, अंगणवाडी, हुंडा निर्मुलन, स्त्री–पुरूष समानता, स्त्री शोषण, जातियता निर्मुलन, सर्वधर्मसमभाव अशा उपक्रमांमध्ये क्रियाशिल सहभाग अशा गोष्टी पुरस्कारासाठी विचारात घेतल्या जातील.

समितीपुढे विचारार्थ ठेवण्यासाठी आपल्या संस्थेतील जास्तीत–जास्त दोन पात्र शिक्षिकांचे स्वंयपुर्ण प्रस्ताव (४ प्रति) त्यांच्या स्वाक्षरीनिशी सोबत जोडलेल्या 'अ', 'ब' आणि 'क' या विवरण पत्रासोबत माहिती भरून आपल्या शिफारशीसह **उप कुलसचिव, महाविद्यालयीन शिक्षक मान्यता विभाग, कक्ष क्र. २०४, दुसरा मजला, विद्यापीठ मुख्य इमारत, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२.** यांच्याकडे **सोमवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२०** पर्यत सादर करावेत. त्यानंतर आलेले प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. तसेच, अपु–या माहितीसह पाठविलेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

आपणांस असेही कळविण्यात येते की, सोबत जोडलेल्या प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविल्याप्रमाणे अर्जदाराच्या प्रस्तावाबाबत सुचक व अनुमोदक अशा दोन विद्यापीठ/महाविद्यालयीन स्तरावरील स्थायी सेवेत असलेल्या शिक्षक कर्मचा–यांच्या स्वाक्ष–या असणे अनिवार्य राहील. त्याचप्रमाणे अर्जदाराने प्रपत्रातील विहित रकान्यात आपल्या स्वतःच्या प्रस्तावास संमती असल्याचे जाहीर करणे आवश्यक राहील.

कृपया आपण हे परिपत्रक सर्व संबधित शिक्षिकांच्या निदर्शनास आणून द्यावे. सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळ www.mu.ac.in या लिंकवर उपलब्ध आहे.

(डॉ. बळीराम गायकवाड)
कुलसचिव

मुंबई – ४०० ०३२.
१४ डिसेंबर, २०१९

Scanned with CamScanner

**पुरस्काराकरीता प्राथमिक अटी :–** खालील अटी पूर्ण करणा–या शिक्षिका "श्रीमती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका" पुरस्काराकरिता अर्ज करण्यास/प्रस्ताव पाठविण्यास पात्र राहतील.

१. शासनाने विहित केलेल्या सेवाप्रवेश नियमानुसार नियुक्त झालेल्या शिक्षिका असणे आवश्यक आहे. तसेच विद्यापीठाची मान्यता प्रत जोडणे आवश्यक राहिल.
२. शिक्षिकांनी नियमित वर्ग अध्यापनाचे कार्य केलेले असावे. अध्यापनाव्यतिरिक्त अन्य क्षेत्रात प्रतिनियुक्तीवर गेलेले/प्रतिनियुक्तीवर आहेत अशा शिक्षिका पुरस्कारासाठी अपात्र राहतील.
३. शिक्षिकांनी कमीत–कमी १५ वर्षांची अध्यापन सेवा केलेली असावी, याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य देतील.
४. "श्रीमती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार" प्राप्त शिक्षिका, पुनःश्च अशा पुरस्काराठी पात्र राहणार नाहीत.
५. शिक्षिकांविरूध्द फौजदारी कारवाईत शिक्षा झालेली नसावी, तसेच पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल नसावा. तसे प्रतिज्ञापत्र संबंधित शिक्षिका देतील.
६. शिक्षिका खाजगी शिकवणी करीत नसाव्या, तसे प्रतिज्ञापत्र संबंधित शिक्षिका देतील.
७. संबंधित महाविद्यालयांचे मुल्यांकन (Accreditation) अनिवार्य राहील. सोबत प्रत जोडावी.
८. (i) विद्यापीठातील विभागप्रमुख/संचालिका यांनी त्यांचा प्रस्ताव मा. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ यांच्यामार्फत सादर करावा. (ii) शासकिय महाविद्यालयातील संस्थेतील, प्राचार्य/संचालिका यांचा प्रस्ताव मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण पुणे यांचे मार्फत सादर करावा. (iii) महाविद्यालयातील प्राचार्य/संचालिका यांनी त्यांचा प्रस्ताव संस्था चालक यांच्या मार्फत सादर करावा.

---

प्रति,

१) सर्व संलग्नित अनुदानित व विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधि, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी व औषधशास्त्र महाविद्यालयांचे प्राचार्य/संस्थांचे संचालक.

(ब) प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाही अग्रेषित :–

१. स्वीय सहायक मा. कुलगुरू, प्र. कुलगुरू, कुलसचिव

Scanned with CamScanner

प्रपत्र 'अ'

सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार" (२०१९–२०)

| | | |
|---|---|---|
| १. | शिक्षिकेचे संपूर्ण नाव | |
| २. | पूर्ण पत्ता | जिल्हा: |
| | भ्रमणध्वनी | |
| | दूरध्वनी क्रमांक (निवास) | |
| ३. | सेवेत असलेल्या महाविद्यालयाचे नाव व पत्ता | |
| ४. | धारण केलेले पद (स्थायी) | |
| ५. | अध्यापनाचा अनुभव | |
| ६. | शैक्षणिक अर्हता | |
| ७. | प्रस्ताव सुचविणा–या शिक्षकाचे संपूर्ण<br>नांव<br>पत्ता<br>भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ८. | सूचकाचे महाविद्यालय<br>नांव,<br>पत्ता व मोहर<br><br>प्रस्ताव सुचविणा–या शिक्षकांची दिनांकित स्वाक्षरी | |
| ९. | प्रस्तावास अनुमोदन देणा–या शिक्षकाचे नाव, पत्ता व दूरध्वनी क्रमांक | |
| १०. | अनुमोदकाचे महाविद्यालय<br>विभागाचे नाव, पत्ता व मोहर<br>प्रस्ताव सुचविणा–या शिक्षकांची दिनांकित स्वाक्षरी | |

मी खाली सही करणार श्रीमती/कुमारी ........................................................................ असे जाहीर करते की उपरोक्त माहिती सत्य असून सदर प्रस्तावास माझी संमती आहे.

दिनांक :

शिक्षिकेची स्वाक्षरी

श्रीमती/कुमारी ............................................................ हया आमच्या विभागात ................................ या पदावर कार्यरत असून मी प्रमाणित करतो/करते की त्यांनी वर दिलेली माहिती सत्य असून सदर पुरस्कारासाठी त्यांच्या नावाची शिफारस करीत आहे.

स्वाक्षरी

विभागाचे संचालक/विभाग प्रमुख
महाविद्यालयाचे प्राचार्य यांची स्वाक्षरी/शिक्का

Scanned with CamScanner

## प्रपत्र – 'ब'

| सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार" (२०१९–२०) गुणतक्ता | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पी.एच.डी. किंवा नेट सेट उत्तीर्ण झालेले असल्यास (प्रती सादर कराव्यात) | ग्रंथ/लेखन इत्यादी (स्त्रियांच्या प्रश्नावरील संशोधन) (प्रति सादर कराव्यात) | सहशैक्षणिक उपक्रमातील सहभाग स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी केलेले उल्लेखनीय कार्य (अंगणवाडी) जातियता निर्मुलन साक्षरता अभियान इत्यादी बाबत सहभाग (प्रति सादर कराव्यात) | सामाजिक उपक्रमामधील सहभाग (स्त्रीशोषणाविरूध्द जाणीव आणि जागृती, स्त्रीयांवरील अत्याचार, हुंडा निर्मुलन इत्यादी बाबत क्रियाशिल सहभाग) | मान्यताप्राप्त संस्थेकडून मिळालेली पारितोषिके/बक्षिसे | थोडक्यात परिचय (स्वतंत्र परिशिष्ट जोडावे– प्राचार्यांनी प्रमाणित केलेले असावे) |
| | | | | | |

दिनांक :

ठिकाण :

विद्यापीठाच्या विभागाचे संचालक/विभागप्रमुख/महाविद्यालयाचे
प्राचार्य यांची स्वाक्षरी व मोहेर/शिक्का

Scanned with CamScanner

## प्रपत्र 'क'

याद्वारे प्रमाणित करण्यात येते की,

श्रीमती/कुमारी ..................................................................................................

.

(आडनाव प्रारंभ करून संपूर्ण नाव)

पदनाम – प्राध्यापक/ अधिव्याख्याता/प्रपाठक ..........................................

...

यांचा गतोतिहास निष्कलंक असून, त्यांचे पूर्वचारित्र्य निर्दोष आहे.

त्यांच्या विरूध्द विभागीय अथवा अन्य प्रकारची कोणतीही फौजदारी चौकशी

किंवा न्यायालयीन कार्यवाही सुरू नाही.

ठिकाण :–

दिनांक :–

स्वाक्षरी

विभागाचे संचालक/विभाग प्रमुख

महाविद्यालयाचे प्राचार्य यांची स्वाक्षरी/शिक्का

Scanned with CamScanner